Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018
SPECIAL ISSUE-XXXII

# Foreign Policy of India

Guest Editor
Prin. Dr. B. S. Yadav
K.J. Somaiya College of Arts, Commerce & Science,
Kopargaon, Tal. Kopargaon,
Dist. Ahmednagar (MS) India.

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Dept. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik (MS) India.

Executive Editors of the Issue : Dr. V. D. Awari & Dr. S. M. Devare
K.J. Somaiya College of Arts, Commerce & Science, Kopargaon.

S.S. Dhamdhere Arts ... Talegaon Dhamdhere
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 500/-



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
January 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 59 | सार्क मधील भारताची भूमिका | प्रा. चंद्रकांत हारदे | 202 |
| 60 | भारत-पाक संबंध व भारताचे परराष्ट्र धोरण | डॉ. व्ही.डी. कापडी | 206 |
| 61 | भारत-अमेरिका संबंध व भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलते संदर्भ | प्रा. अरुण पोटे | 211 |
| 62 | भारताचे परराष्ट्रीय धोरण आणि अलिप्तता चळवळ | प्रा. राजेंद्र पवार | 215 |
| 63 | भारत-अमेरिका संबंध | डॉ. राजकुमार रिकामे | 219 |
| 64 | भारत-अमेरिका संबंध आदर्शवादाकडून वास्तववादाकडे वाटचाल | प्रा. एस. डी. गायकवाड व प्रा. ए. पी. बनारसे | 223 |
| 65 | दक्षिण आशियाई उपखंडात प्रादेशिक सहकार्य निर्मितीत भारताची भूमिका | डॉ. हेमलता राठोड व प्रा.नानासाहेब दिघे | 225 |
| 67 | शस्त्रास्त्र नियंत्रण आणि भारत | डॉ. दत्तात्रय वाबळे | 228 |
| 68 | दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटनेतील भारताची भूमिका | डॉ .संजय काळे | 232 |
| 69 | दक्षिण आशियातील लोकशाहीला अपयश : भारतासाठी समस्या | प्रा.मेघराज औटी | 236 |
| 70 | भारताची 'सार्क'मधील भूमिका | श्री जिजाभाऊ घुले | 239 |


**Note :** *The Opinions / views expressed in the articles published in this Research Journal by the authors are of their own and the Editors and publishers do not necessarily agree with them. The authors themselves are responsible for the contents of their Research Papers.*

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | January 2018
Special Issue 32 : Foreign Policy of India
UGC Approved No. 40705 & 44117

# शस्त्रास्त्र नियंत्रण आणि भारत

डॉ. दत्तात्रय वाबळे,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
एस.एस. ढमढेरे महाविद्यालय, तळेगांव ढमढेरे, ता. शिरुर जि. पुणे
dcwabale@gmail.com

**प्रस्तावना :**

१८ व्या शतकात युरोपियन देशांमध्ये सैन्यबळ वाढविण्याची स्पर्धा सुरु झाली. प्रामुख्याने पहिल्या महायुध्दापूर्वी फ्रान्स आणि जर्मनी यांच्यात सैन्यातील मनुष्यबळ वाढविण्याची स्पर्धा होती. युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यविस्तार व संघर्षाच्या भूमिकेमुळे जगाला महायुध्दांना सामोरे जावे लागले. दोन्ही महायुध्दे युरोप खंडाच्या भूमीवर झाली असली तरी त्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संपूर्ण जग ओढले गेले. दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने अनुबॉम्बचा वापर केला. त्यानंतर युरोपियन देशांमध्ये अण्वस्त्र निर्मितीची स्पर्धा सुरु झाली. महासत्तांमधील गटबाजी, शीतयुध्द आणि अण्वस्त्र स्पर्धा यामुळे संपूर्ण जग असुरक्षित बनले. परिणामी जागतिक शांतता धोक्यात आली. महासत्तांमधील गटबाजीपासून दूर राहण्यासाठी तिसऱ्या जगातील राष्ट्राने अलिप्ततेचे धोरण स्विकारले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून शस्त्रास्त्र आणि अण्वस्त्र नियंत्रणासाठी प्रयत्न झाले. यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची ठरते.

**महासत्तांमधील अण्वस्त्र स्पर्धा :**

साम्राज्यवादी भूमिकेमुळे जग दोन महायुध्दांना सामोरे गेले. दुसऱ्या महायुध्दात विजयी झालेल्या दोस्त राष्ट्रांना जागतिक राजकारणात महत्त्व प्राप्त झाले. दोस्त राष्ट्रांमधील सोविएत युनियन आणि इतर देश यांची विचारप्रणाली भिन्न होती. त्यामुळे अमेरिका आणि सोविएत युनियन यांच्यात विचारप्रणालीवर आधारीत संघर्ष सुरु झाला. रशियाने पूर्व युरोपात साम्यवादाच्या विस्ताराचे धोरण स्वीकारले तर अमेरिकेने आपल्या मित्रपक्षांच्या मदतीने साम्यवादाचा प्रसार रोखण्यात पुढाकार घेतला. यामुळे अमेरिका आणि सोविएत युनियन यांच्यात संघर्ष सुरु झाला.

दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकल्याने त्यांची अण्वस्त्र सज्जता सिध्द झाली होती. अमेरिकेच्या अण्वस्त्र सज्जतेचा दोस्त राष्ट्रांना फायदा झाला असला तरी दुसऱ्या महायुध्दानंतर सोविएत युनियनला अमेरिकेची भिती वाटू लागली. परिणामी सोविएत युनियनने अणुबॉम्ब बनविण्यास प्राधान्य दिले. १९४९ मध्ये सोविएत युनियनने यशस्वी अणुचाचणी केली आणि या दोन देशांमध्ये अण्वस्त्र स्पर्धा सुरु झाली. १९५२ साली इंग्लंडने आणि १९६१ साली फ्रान्सने अणुचाचण्या केल्या. १९६५ साली चीनने अणुचाचणी केली. या पाचही देशांनी पुढील काळात आपली अण्वस्त्र सज्जता वाढविली. अणुबॉम्बचा मारा करण्यासाठी त्यांनी कमी, मध्यम आणि लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे बनविली.

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका आणि सोविएत युनियन या दोन महासत्ता उदयास आल्या. त्यांच्यात प्रभावासाठी शीतयुध्द सुरु झाले. त्यांनी आपले गट प्रबळ करण्याचे धोरण स्वीकारले. त्यांनी आपापल्या गटातील राष्ट्रांना आर्थिक आणि लष्करी मदत केली. तसेच सामुहिक सुरक्षिततेच्या तत्वावर आधारीत नाटो, सिटो, सेंटो आणि वॉर्सा असे करार झाले. या करारांच्या माध्यमातून आपल्या गटांमध्ये

Principal
S.S. Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist. Pune-412 208

सहभागी झालेल्या राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी महासत्तांनी घेतली. परिणामी महासत्तांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव निर्माण झाला.

भारत आणि अण्वस्त्र निर्मिती :

भारताने स्वातंत्र्यानंतर अमेरिकेच्या मदतीने अणुसंशोधनास सुरुवात केली. विकासासाठी अणुसंशोधन हे भारताचे धोरण होते. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण करुन भारतीय प्रदेश जिंकला व एकतर्फी युध्दबंदी केली. १९६५ साली चीन अण्वस्त्र सज्ज बनला. त्यामुळे भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला. परिणामी भारताने अणुसंशोधन धोरणात बदल केला. आर्थिक विकासाबरोबरच स्वसंरक्षणासाठी अणुसंशोधन अशी भूमिका भारताने घेतली आणि गुप्त पध्दतीने अणुसंशोधन कार्यास सुरुवात केली. १९७० च्या दशकात पाकिस्तान, चीन, अमेरिका यांच्यातील युतीला शह देण्यासाठी भारताने १९७१ साली रशियाबरोबर २० वर्षे मैत्रीचा करार केला आणि १९७४ साली पहिली अणुचाचणी केली.

भारताने अणुचाचणी केल्यामुळे अमेरिका, कॅनडा, फ्रान्स या देशांनी भारतास अणुतंत्रज्ञान देण्याचे बंद केले. पुढील काळात भारत अणुतंत्रज्ञानाबाबत स्वावलंबी बनला. स्वदेशी तंत्रज्ञान वापरुन भारताने अणुभट्टया उभारल्या, अणुसंशोधन केंद्रे स्थापन केली. पाकिस्तान आणि चीनच्या आण्विक सहकार्यामुळे भारताच्या सुरक्षिततेपुढे गंभीर प्रश्न निर्माण झाला. भारताचा मित्र असलेल्या रशियाचे विघटन झाले. अमेरिका ही एकमेव महासत्ता आणि भारत यांच्यात मित्रत्त्वाचे संबंध नव्हते. १९९६ साली तयार करण्यात आलेला सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करारास विरोध करुन संपूर्ण निशःस्त्रीकरणाची भूमिका भारताने मांडली. शांतता आणि स्वसंरक्षणासाठी कोणाच्याही दबावाला बळी न पडता आपला अणुकार्यक्रम चालू ठेवला. त्यासाठी नरसिंहराव, गुजराल आणि वाजपेयी सरकारची धोरणे महत्त्वाची ठरले. १९९८ साली अणुचाचण्या करुन भारताने स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. भारताने केलेल्या अण्वस्त्रांचा विकास स्वसंरक्षणासाठी असला तरी आंतरराष्ट्रीय जनसमुदायाने विशेषतः अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादले.

१९९९ साली भारताने नवे अणुधोरण जाहीर केले. त्यामध्ये भारताचा अण्वस्त्र कार्यक्रम स्वसंरक्षणासाठी असेल, आक्रमणासाठी नाही. तसेच भारत अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही, अण्वस्त्र नसलेल्या राष्ट्रांविरुध्द वापर करणार नाही, हे स्पष्ट केले. भारताच्या या भूमिकेमुळे मनमोहनसिंग सरकारच्या काळात अमेरिकेने घातलेले आर्थिक निर्बंध शिथील करण्यात आले. त्यासाठी भारत-अमेरिका यांच्यात २००६ मध्ये झालेला करार महत्त्वाचा ठरतो.

संयुक्त राष्ट्रसंघ आणि अण्वस्त्र नियंत्रण :

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता हे संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभासद देशांनी आपापसातील विवाद शांततामय मार्गाने सोडविण्याची तरतूद करारनाम्यात केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीत अमेरिका, सोविएत युनियन, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या पाच दोस्त राष्ट्रांना कायम सदस्यत्व आणि नकाराधिकार देण्यात आला. असे असले तरी महासत्तांमध्ये वर्चस्वासाठी संघर्ष सुरु झाला होता.

शीतयुध्दाच्या काळात अमेरिका आणि सोविएत युनियन यांच्यामधील अण्वस्त्र स्पर्धा तीव्र बनली. महासत्तांनी आपले गट प्रबळ बनविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अण्वस्त्र सज्जतेमुळे संघर्षमय स्थितीत पृथ्वीचा विनाश अटळ होता. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन अण्वस्त्रांचे उत्पादन आणि त्यांच्या



ज्योतिर्गमय
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
January 2018

प्रसाराच्या कार्यावर नियंत्रण आणण्यासाठी निःशस्त्रीकरणाच्या कार्यात पुढाकार घेतला. त्यासाठी सुरुवातीपासूनच विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरु केले. प्रामुख्याने १९६९ साली अण्वस्त्र प्रसारबंदी करार केला. या करारानुसार ज्यांच्याकडे अण्वस्त्रे आहेत ती त्यांच्याकडे राहणार होती. मात्र ज्यांच्याकडे ती नाहीत त्यांना ती नव्याने निर्माण करता येणार नव्हती किंवा ती इतरांकडून आयात करता येणार नव्हती. या करारावर अमेरिकेसह १८६ देशांनी सह्या केल्या. मात्र भारत, पाकिस्तान, इस्त्राईल यासारख्या देशांनी या करारावर सह्या केल्या नाहीत.

१९८० च्या दशकात अमेरिका आणि सोविएत युनियन यांच्यात करार होऊन टप्प्याटप्प्याने काही प्रमाणात अण्वस्त्रे कमी करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून त्यासाठी झालेल्या प्रयत्नास महासत्तांनी प्रतिसाद दिला. अमेरिका आणि रशिया यांनी अण्वस्त्र कपातीचा कार्यक्रम तयार करुन अंमलात आणला. त्यामुळे त्यांच्याकडील अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे काही प्रमाणात कमी झाली. त्याचा परिणाम इतर अण्वस्त्रधारी राष्ट्रांवर झाला.

संपूर्ण जगातून आण्विक शक्ती नष्ट करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून१९९६ साली जीनीव्हा येथे परिषद झाली. त्यावेळी सर्वंकष अणुचाचणी बंदी करार करण्यात आला. या करारानुसार सर्वप्रकारच्या अणुचाचण्यांवर बंदी घालण्यात आली. कराराचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द नियंत्रण करणारी आंतरराष्ट्रीय निरीक्षण योजना तयार करण्यात आली. जगातील कोणताही देश अणुचाचणी घेत आहे, अशी शंका आल्यास त्याची चौकशी करण्याचा अधिकार आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाला देण्यात आला. आतापर्यंत या करारावर १४४ देशांनी सह्या केल्या आहेत.हा करार अंमलात आणण्यासाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पुढाकार घेतला असला व सर्वात प्रथम करारावर सही केली असली तरी अमेरिकेच्या सीनेट सभागृहाने हा करार फेटाळला आहे. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रास आणि चीन ही पाच अण्वस्त्रधारी राष्ट्रे आणि अण्वस्त्रनिर्मिती क्षमता असलेल्या ४४ राष्ट्रांनी या करारास मान्यता दिली तरच तो अंमलात येणार आहे.

RESEARCHJOURNEY

अण्वस्त्र नियंत्रणाबाबत भारताची भूमिका :

संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर भारताने जागतिक शांततेचे धोरण स्वीकारले. जागतिक शांतता टिकविणे आणि राष्ट्राराष्ट्रांमधील वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्से हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट्य आहे. त्यास अनुसरुन भारताने शीतयुध्दाच्या काळात महासत्तांच्या गटबाजीच्या राजकारणात सहभागी न होता अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले. भारताने अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्त्व केले. अलिप्ततावादी चळवळीमुळे महासत्तांमध्ये समन्वय साधणे आणि त्यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत झाली. जागतिक शांतता आणि सुरक्षितता कायम राखण्यासाठी भारताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून पुढाकार घेतला. संयुक्त राष्ट्रसंघाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या.

भारताने स्वसंरक्षणासाठी अण्वस्त्र सज्जता प्राप्त केली. मात्र स्वतःहून अण्वस्त्रांचा वापर न करण्याचे धोरण स्वीकारले.तसेच अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या अण्वस्त्र कपात व नियंत्रणाबाबतदुटप्पीपणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे अण्वस्त्र प्रसारबंदी करार आणि सर्वकष अणुचाचणी करार यांस भारताने विरोध केला. भारताने अण्वस्त्र प्रसाराच्या संदर्भात बड्या राष्ट्रांच्या भूमिकेपेक्षा वेगळी भूमिका घेतली. अण्वस्त्र नियंत्रण गुणात्मक व मात्रात्मक स्वरुपाचे असते.अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी गुणात्मक निःशस्त्रीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यामुळे अण्वस्त्रधारी राष्ट्रांचे इतर राष्ट्रांवर वर्चस्व निर्माण होणार होते. म्हणून भारताने मात्रात्मक

Principal
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur, Dist. Pune

ISSN : 2348-7143
January 2018

नि:शस्त्रीकरणाचे धोरण स्वीकारुन अस्तित्वात असलेली सर्व अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे प्रथम नष्ट करण्याची भूमिका घेतली.

सारांश :

महासत्तांमधील साम्राज्यवादी धोरण, शीतयुध्द, आपआपले गट प्रभावी करण्याचे धोरण आणि अण्वस्त्र स्पर्धा यामुळे जागतिक शांतता पुन्हा धोक्यात आली. ती नियंत्रीत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने महत्त्वाची भूमिका बजावली. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे, शांतता भंग करणाऱ्या कृत्यांना पायबंद घालणे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून झालेल्या प्रयत्नांना महासत्तांकडून प्रतिसाद मिळाला. अमेरिका आणि रशिया यांनी अण्वस्त्र कपातीचा कार्यक्रम तयार करुन अंमलात आणला. त्यामुळे त्यांच्याकडील अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे काही प्रमाणात कमी झाली.

भारताने १९५० सालापासून संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या कार्यात सतत भाग घेतला आहे. भारताने आतापर्यंत ३३ हून अधिक ठिकाणी युनोच्या शांतता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. जागतिक शांतता व सुरक्षितता राखण्याचे संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्दिष्ट्य साध्य होण्यासाठी भारताने बांधिलकी स्वीकारली आणि युनोने सोपविलेली जबाबदारी पार पाडली. महासत्तांच्या गटबाजीपासून दूर राहून अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून त्यांच्यात समन्वय साधला.

२१ व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संयुक्त राष्ट्रसंघावर अमेरिकेचा प्रभाव आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतिसेनेच्या मोहिमा अमेरिकेच्या मदतीवर चालतात. त्यामुळे अमेरिकेचे एखाधिकारशाही निर्माण झाली आहे. परिणामी अमेरिकेने युगोस्लाव्हिया, अफगाणिस्थान, इराक इत्यादी राष्ट्रांविरुध्द केलेल्या लष्करी कारवाया व क्षेपणास्त्रांचे हल्ले संयुक्त राष्ट्रसंघाला सहन करावे लागले आहेत.

RESEARCHJOURNEY

संदर्भ :

1. Chopra J. K., India and The World, Unique Publishers, New Delhi, 2013.
2. देवळाणकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१०.
3. Khanna V. N., Foreign Policy of India, Vikas Publishing House, New Delhi, 2012.
4. पेंडसे अरुणा आणि उत्तरा सहस्त्रबुध्दे, आंतरराष्ट्रीय संबंध : शीतयुध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट लॉंगमन, हैदराबाद, २००८.
5. रायपुरकर वसंत, आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००६.
6. वराडकर र. घ., भारत आणि जग, निराली प्रकाशन, पुणे, २०१०.

तमसो मा ज्योतिर्गमय
Principal
S.S. Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208



Scanned with CamScanner